**मजकुर :—**

दिनांक ०९/११/२०२० रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने " **Best Detection of the Month** " **माहे सप्टेंबर २०२०** या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ सप्टेंबर — २०२०

| | | |
|---|---|---|
| ०५ | **मालाड पोलीस ठाणे परिमंडळ—११** | **गु.र.क्र. ६९८/२०२०, कलम ४२०, ४०६, १२० (ब) भादवि** |

**—: ' फसवणूक ':—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** नमुद गुन्हयात दिनांक ०८/०९/२०२० रोजी फिर्यादी निर्मल डुंगरदास वैष्णव, वय २८, यांना एका इसमाने मो. क्रमांकावरून संपर्क केला व जुन्या ओळखीचा संदर्भ देवुन विश्वास संपादन केला. नमुद इसमाने मनी एक्सचेज करण्यासाठी २,७५,००१/— युरो पाहिजे असल्याचे सांगितले व त्याबद्दल भारतीय चलनाची रक्कम घेवुन त्यांच्या माणुस येत असल्याचे भासवुन सदरचे युरो घेवुन गेला. भारतीय चलणाच्या एकुण रू २४,००,७५०/—रू (चोवीस लाख सातशे पन्नास रूपये) अशा किंमती फसवणुक केली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | निर्मल डुंगरदास वैष्णव, वय २८, |
| **चोरीस गेलेला माल.** | :— | २,७५,००१/— युरो चलन, व भारतीय चलनातील रक्कम :२४,००,७५०/—रू (चोवीस लाख सातशे पन्नास रूपये) |
| **हस्तगत मालमत्ता** | :— | ११,३००/—युरो चलन, भारतीय चलनातील रक्कम रु. ०९,८७,०००/—(अक्षरी नऊ लाख सत्यांऐशी हजार रूपये,) |
| **आरोपी अटक व दिनांक** | :— | १) गंगासिंह भिकसिंह राजपुर वय ३० वर्षे<br>२) दुरगसिंह भुरसिंह राजपुत वय ४५ वर्षे,<br>३) हनवंतसिंह चेंनसिंह देवडा उर्फ राजपुत वय २७ वर्षे<br>अटक दिनांक २६/०९/२०२० रोजी |

**तपास कौशल्य** :— सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने तपासी अधिकारी पो.नि. प्रमोद तोरडमल यांनी फिर्यादी यांचेकडे केलेल्या चौकशीमध्ये फिर्यादी यांना वेगवेळया तीन मोबाईल क्रमांकावरुन आरोपीतांनी संपर्क केल्याचे आढळुन आले. पो.नि. तोरडमल यांनी नमुद मोबाईल क्रमांकांचे सिडीआर प्राप्त करुन त्याचा बारकाईने तपास करता सदरचे नमुद मोबाईल क्रमांकांचा वापर फक्त गुन्हा करण्यासाठी करण्यात आल्याचे दिसुन आले. तसेच नमुद मोबाईल क्रमांकाचे आयएमइआयबाबत तपास केला असता नमुद मोबाईल हॅन्डसेंट देखील गुन्हा करण्यासाठी वापरण्यात आला होता. नमुद चौकशीत गुन्हयातील पाहिजे आरोपींबाबत कोणताही ठोस पुरावा अथवा साक्षीदार मिळुन आला नाही.

गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त (परिमंडळ ११), सो यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे व मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक जॉर्ज फर्नाडीस, मालाड पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनान्वये पो. नि. प्रमोद तोरडमल यांनी नमुद गुन्हयाची उकल करण्यासाठी एक विशेष पथक तयार केले. गुन्हयाचे तपासाचे संबंधाने सदर पथकाने फिर्यादी यांच्या शॉपमध्ये आलेल्या इसमाचा शॉपमध्ये येण्यापुर्वीच्या हालचाली तपासण्यासाठी सिसिटीव्ही फुटेज प्राप्त करुन त्यांची अत्यंत काळजीपुर्वक तपासणी केली असता गुन्हयातील संशयीत पाहिजे इसम हा फिर्यादी यांचे दुकानात येण्यापुर्वी घटनास्थळापासुन काही अंतरावर एका ऑटो रिक्षामधुन त्याच्या साथीदारांसोबत उतरत असताना मिळून आले. सदर एका दुव्याच्या आधारे तपासी पथकाने त्यांचा सिसिटीव्हीद्वारे माग घेतला असता नमुद इसम काही अंतरावरील एका एटीएम सेंटरमध्ये पैसे काढण्यासाठी गेल्याचे दिसुन आले. सदरवेळी त्यानी केलेल्या ट्राझेक्शनची बॅकेकडे पत्र व्यवहार व योग्य पाठपुरावा करुन माहिती प्राप्त केली असता त्यांनी व्यवहाराचे वेळी वापरलेले एटीएम कार्ड एका महिलेचे असल्याचे निष्पण्ण झाले. तसेच सदर महिलेच्या खात्यावर काहीही शिल्लक नसल्याचे दिसुन आले.

मालाड पोलीस ठाणे अंतर्गत बसविण्यात आलेल्या एल ॲण्ड टी कॅमेरे तसेच परिसरातील बिल्डींगमधिल सीसीटीव्ही कॅमेरे यांचे फुटेज प्राप्त करुन त्याचे अत्यंत काळजीपुर्वक बारकाईने निरीक्षण केले असता नमुद आरोपी हे बांद्रा पश्चिम मुंबई येथुन मालाड येथे ऑटो रिक्षामधुन आल्याचे दिसुन आले. पो.नि. तोरडमल व पथकाने मालाड ते बांद्रा येथील मार्गावरील जवळपास १२० ते १२५ सिसिटिव्ही फुटेज प्राप्त करुन त्यांचा अत्यंत काळजीपुर्वक निरीक्षण केले. सदरवेळी आरोपीतांनी वापरलेल्या रस्त्यावरील मोबाईल रुट डम्पडाटा तसेच घटनास्थळावरील डम्पडाटा यांचा अभ्यास करण्यात आला. नमुद आरोपीतांच्या इतर साथीदारांनी अजमेर राज्यस्थान येथुन कॉल केले असल्याने तेथील डम्प डाटा प्राप्त करुन त्याचे अवलोकन करण्यात आले. सदर तपासावरुन नमुद गुन्हयातील आरोपीत हे शिरोही राज्यस्थान येथील असल्याचे निष्पन्न झाले.

गुन्हयातील तपासी अधिकारी प्रमोद तोरडमल व पथक आरोपीताबाबत अचुक माहिती प्राप्त करुन तात्काळ शिरोही राज्यस्थान येथे पथकासह रवाना झाले. सदर ठिकाणी तपासी पथकाने तांत्रिक तपास व मानवी कौशल्याचे आधारे गुन्हयातील एका आरोपीस शिरोही राज्यस्थान येथुन ताब्यात घेतले. नमुद आरोपीताकडे गुन्हयाचे अनुषंगाने कसुन सखोल चौकशी करुन त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे गुन्हयातील उर्वरीत दोन आरोपींना सरत, तालुका जालोर, जिल्हा जालोर, राज्य राज्यस्थान येथुन ताब्यात घेण्यात आले. सदरहू वेळी आरोपीतांनी त्यांना ताब्यात घेत असताना पळुन जाण्याचा प्रयत्न केला असता पथकाने त्या आरोपीताचा पाठलाग केला. व शिताफीने ताब्यात घेवुन त्यांच्याकडुन गुन्हयातील फसवणुकीद्वारे मिळविलेले ११३०० युरो भारतीय चलनातील रक्कम रु. ०९,८७,०००/— (अक्षरी रुपये नऊ लाख सत्त्याऐंशी हजार फक्त) हस्तगत केली.

पो.नि तोरडमल व पथकाने नमुद आरोपीतांची कसुन सखोल चौकशी केली असता त्यांनी त्यांचे साथीदार सुरज राजपुर, सुरेंद्रसिंह यांच्या सांगण्यावरुन नमुद गुन्हा केला असल्याचे कबुल केले. नमुद आरोपीताकडुन मिळुन आलेली मालमत्ता सविस्तर पंचनाम्यान्वये हस्तगत करण्यात आली. सदर गुन्हयातील आरोपीतांचा सक्रीय सहभाग असल्याचे निष्पन्न झालेवरुन तसेच त्यांचे ताब्यातुन गुन्हयातील फसवणुक केलेले एकुण ११३०० युरो हस्तगत झालेवरुन नमुद आरोपीतांना दिनांक २६/०९/२०२० रोजी रितसर अटक करण्यात आली.

नमुद गुन्हयातील आरोपींचा गुन्हे अभिलेख तपासला असता, आरोपी नामे गंगासिंह भिकसिंह राजपुर वय ३० वर्षे याच्यावर अशा प्रकारचे दोन गुन्हे नोंद असल्याची माहिती प्राप्त झाली.
१) एल.टी. मार्ग पोलीस ठाणे — गु.र.क्र. १५६/१८ कलम ४२०,१२० (ब) भा.द.वि.
२) व्ही पी. मार्ग पोलीस ठाणे — गु.र.क्र. १५२/१८ कलम ४२०,१२० (ब) भा.द.वि.

सदर गुन्हयात कोणत्याही प्रकारचा पुरावा तसेच साक्षीदार उपलब्ध नसताना केवळ तांत्रिक तपासाचे कौशल्याद्वारे एकुण ३ आरोपीतांना राजस्थान जिल्हा जालोर, येथुन यशस्वीरित्या ताब्यात घेवून त्यांचेकडे केलेल्या तपासात एकुण ११३००/— युरो भारतीय चलनात :—०९,८७,०००/—रू (नऊ लाख सत्याऐंशी हजार रू) हस्तगत करण्याचा यशस्वी प्रयत्न करुन जनमानसात पोलीसांची प्रतिमा उंचावली आहे.

**मालाड पोलीस ठाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | जॉर्ज पिटर फर्नाडीस | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | प्रमोद भास्करराव तोरडमल | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पो.उ.नि. | प्रविण मधुकर तुषारे | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.ह.क्र. 33813 | गोरखनाथ भिकु पवार | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.ना.क्र. 980869 | सचिन सदाशिव सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पो.शि.क्र. 080281 | बसवेश्वर बिळेणसिध्द चुंगीवडीयार | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पो.शि.क्र. 092370 | सुनिल रघुनाथ जाधव | प्रशस्तीपत्रक |